**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.</u>**

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३६७/२००८</u>**

**नि.क्र.४७**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो ते खालीलप्रमाणे की,

नांव :— संतोष महादेव सुर्वे
वय:— ४५ वर्षे धंदा:— शेती
राहणार :— राउतवाडी ता. वाई जि. सातारा

**<u>शपथेवर सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ.एस.एम.महाडिक यांचेमार्फत</u>**

१. दिनांक २१/७/२००८ रोजी राउतवाडी येथे चंदन चोरीच्या कारणावरून लोक जमा झाले होते. त्याठिकाणी मी गेलो असता तेथे माझी पंचनाम्यावर सही घेण्यात आली. आता मला नि.क्र. ४३ वरील पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तथापि यातील मजकूराविषयी मला काहीही माहिती नाही.

<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसलेमुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्त्याच्या विनंतीवरून साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात येत आहे.</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/७/२००८ रोजी मला राउतवाडी येथे वनपाल यांनी पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. त्याठिकाणी दुसरे पंच प्रविण जाधव हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, गणपत ढाणे यांच्या शेतातील चंदनाचे झाड कापून नेत असताना आरोपींना पकडलेले होते व त्याठिकाणी पंचनामा करण्यासाठी मला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष घटनास्थळी गेलो असता त्याठिकाणी झाड तोडल्याचे व झाडाचा पाला ओला असलयाचे दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दोन व्यक्तींना पकडण्यात आले होते त्यांनी त्यांची नावे शामराव मदने व सयाजी जाधव अशी सांगितली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या व्यक्तींकडे त्यांची झडती घेतली असता सहा ते सात चंदनाचे तुकडे, करवत, व कुदळ अशा वस्तु मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी ज्या ठिकाणावरून चंदनाचे झाड तोडले होते ते ठिकाण गणपत ढाणे याच्या शेतातील होते व त्यांनी दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणाचे व झाडाची मोजमापे वनरक्षक यांनी माझेसमक्ष घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, तसा पंचनामा केल्यानंतर तो मी वाचून पाहिला व त्यानंतर

मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो. मी फिर्यादीस ओळखत नाही अथवा वनरक्षक यांना ओळखत नाही. मी पंचनाम्यावर स्वेच्छेने सही केली होती. मी कोणत्याही व्यवहाराच्या वेळी कागदपत्र वाचूनच त्यावर सही करतो. मी कोणत्याही कारणाशिवाय कोठेही सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असलयामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड.क्र. ४ ए.पी.बुधावले यांचेतर्फे सुरू :—**

३. आरोपींचे विधीज्ञ पुकारता गैरहजर. सबब उलटतपास नाही असा आदेश पारित.

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड.क्र. १ एस.ए.तावरे यांचेतर्फे सुरू :—**

४. आरोपींचे विधीज्ञ पुकारता गैरहजर. सबब उलटतपास नाही असा आदेश पारित.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.** **समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत**

**( डी.आर.माळी )**
**दिनांकः— ०३/१२/२०१९ दुसरे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,वाई**